# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०२/२०२६ (रविवार)

## अवैधरीत्या गॅस सिलेंडरची विक्रीसाठी साठवणूक करणाऱ्या २ आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८८ नग गॅस सिलेंडर जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन बुटीबोरी :— दिनांक २१/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी नागपूर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना पोलीस पथकाला गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत मौजा बोरखेडी रेल्वे येथे **आरोपी हरिष विलासराव फंड, वय ३८ वर्ष, २) अतुल वसंतराव नंदनवार, वय ५० वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र. ३ बोरखेडी रेल्वे, ता.जि. नागपूर** यांनी आपले दुकानात स्वत:चे फायदया करीता अनाधिकृत विनापरवाना अत्यावश्यक वस्तु गॅस सिलेंडर चा साठा करून ठेवला आहे. साठा करून ठेवलेले गॅस सिलेंडर सरकारी भावा पेक्षा जास्त दरात ग्राहकांना विक्री करण्याचे उद्‌देशाने बाळगुन काळाबाजार करित आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पथकाने मौजा बोरखेडी येथे पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे हरिष विलासराव फंड, वय ३८ वर्ष, २) अतुल वसंतराव नंदनवार, वय ५० वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र. ३ बोरखेडी रेल्वे, ता.जि. नागपूर यांच्या दुकानात धाड टाकली असता दोघेही** अवैधरीत्या विनापरवाना गॅस सिलेंडर स्वत: जवळ बाळगुन विक्री करीतांना मिळुन आले. आरोपीस गॅस सिलेंडर विक्री करणे बाबत परवाना विचारला असता त्यांच्या कडे कोणताही परवाना नसल्याचे माहीती समजली.

पोलीसांनी पंचासमक्ष दोन्ही आरोपीतांचे ताब्यातून ८८ नग घरगुती व व्यावसायिक वापरातील लहान मोठे आकाराचे एकुण ८८ नग गॅस भरलेले व रिकामे गॅस सिलेंडर किंमती १,८४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी दोन्ही आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ७, ३ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरीत्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद , वाहनासह विदेशी दारू असा एकुण ८ लाख ७२ हजरांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण आणि पोलीस स्टेशन कन्हान यांची संयुक्त कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक २१/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, कारने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली जात आहे. नमुद पथकाने सदर माहिती कन्हान पोलीसांना दिली. कन्हान पोलीसांनी बोर्डा शिवार येथे नाकाबंदी केली असता होंन्डा सिटी कंपनीची कार क्र एम.एच ४८ सी— ३६९८ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात विदेशी दारू मिळुन आली.. **आरोपी क्र. १) नामे प्रेमकुमार श्रीनाथ सिंग, वय ३४ वर्ष, रा. सुंदर नगर ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपुर २) प्रिंसकुमार श्रीनाथ सिंग, वय ३६ वर्ष, रा. सुंदर नगर ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपुर** हे अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष १) **ROYAL STAG SUPERIOR WHISKY** कंपनीच्या ६२४ **विदेशी दारूच्या निपा किंमती १,६२,२४०/— रूपये आणि होंन्डा सिटी कंपनीची कार क्र एम.एच ४८ सी— ३६९८ किंमती ७,००,०००/—रूपये, रेडमी कंपनीचा ॲड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/—रूपये असा एकुण किंमती ८,७२,२४०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.** नमुद आरोपीतांविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.




## अवैधरित्या अंमली पदार्थ गांजा बाळगुन विक्री करणाऱ्या अरोपीतांवर गुन्हा नोंद, १ किलो ३६० ग्रॅम गांजा जप्त, देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक २०/०२/२०२६ रोजी देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. आरोपी नामे मोहम्मद हनिप रहेमुल्ला अन्सारी, रा. देवलापार हा आपल्या राहते घरी अंमली पदार्थ गांजाची विक्रीसाठी साठवणूक केली आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे

पोलीसांनी घटनास्थळी येथे पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १) मोहम्मद हनिप रहेमुल्ला अन्सारी, वय ६८ वर्ष, रा. देवलापार याच्या घराची घरझडती घेतली असता घरझडती मध्ये एका प्लास्टिक पिशवीमध्ये अमंली पदार्थ गांजा भरून ठेवलेला मिळून आला. तसेच आरोपी क्र. २) विशाल हरपाल हनवते, वय १८ वर्ष, रा. देवलापार ३) राजेश गेंदलाल पिपलवार, वय २७ वर्ष, रा. कटटा ता रामटेक ४) जगमोहन आयब्रान खोब्रागडे, वय १९ वर्ष, रा. पवनी ता रामटेक हे गांजा ची पुडी खरेदी करतांना मिळून आलें.

**पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ गांजा १किलो ३६० ग्रॅम किंमती १३,०००/—रुपये, ०३ मोबाईल २०,०००/— रुपये, रोख रक्कम किंमती १५३०/—रूपये व गांजा विक्री करण्यासाठी लागणारे साहित्य असा एकुण ३५,५३०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ८(क), २०(ब)(ii), २९ एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ४५ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक २०/०२/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी बालाजी बार समोर वडोदा शिवार येथे नाकाबंदी केली असता वाहन ट्रक क्र. एम एच ४० डीसी ९३०० मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता **ट्रक चालक नामे रूपेश प्रभाकर धार्मिक, वय**

**३७ वर्ष, रा. तकीयावार्ड भंडारा** असे सांगितले. सदर ट्रक त्याच्याच मालकीचा असल्याची माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन** १) ट्रक क्र. एम एच ४० डीसी ९३०० **किंमती** ४५,००,०००/—**रूपये** २) १० **ब्रास रेती किंमती** ५०,०००/— **रूपये असा एकुण** ४५,५०,०००/— **रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपीच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम** ३०३ (२) **भा.न्या.सं सहकलम** ४८(७), ४८(८) **महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम** ४, २१ **खाण खनिज अधिनियम सहकलम** ०३ **सार्वजनिक संपती नूकसान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने